लोकमत

# पिंपरीच्या डी. वाय. पाटील महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय मोहिमेंतर्गत 'सायबर वॉरियर क्लब'

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** डिजिटल युगात सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, पिंपरी आणि क्विक हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या राष्ट्रीय मोहिमेंतर्गत सायबर वॉरियर क्लबची स्थापना करण्यात आली. यंदाच्या मोहिमेची संकल्पना माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी अशी असून, ती विशेषतः शेतकरी बांधवांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी समर्पित करण्यात आली आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरू करण्यात आला. या माध्यामातून जनजागृती करण्यात येईल.



पिंपरी येथील डी. वाय. पाटील महाविद्यालयात 'सायबर वॉरियर क्लब'ची स्थापना करण्यात आली आहे.

**यंदाची संकल्पना शेतकरी बांधवांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी समर्पित**

## सायबर सुरक्षेविषयी जनजागृती

क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा कटकर व सहयोगी संचालक अजय शिर्के यांच्या प्रेरणेतून साकारलेल्या या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील, उपप्राचार्य डॉ. जयवंत बाबर यांनी स्वागत केले. सायबर वॉरियर क्लबच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये, शेतकरी,कामगार आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जनजागृती केली जाणार आहे. वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.या उपक्रमासाठी प्रा. सत्यवान कुंजीर यांची शिक्षक समन्वयक म्हणून नियुक्ती केली असून, नेहा मडिवालकर, कैवल्य गुरव, प्रणाली माने आणि सार्थक पानसरे यांची विद्यार्थी पदाधिकाऱ्यांमध्ये निवड केली आहे.